# आदिवासी समस्या आणि उपाय

**श्रीमती कल्पना पुरुषोत्तम कोकणी,** संशोधक विद्यार्थिनी, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

---

**प्रास्तवीक**

मानववंश शास्त्रीय दुष्टया वन्य जाती हा भारतीय लोकसमाजाचा प्राचीनतम जमातींना आदिवासी म्हणतात. आज भारतीय समाजरचने प्रमाणेच महाराष्ट्राच्या समाजरचनेची पारंपारिक चौकट चातुवर्ण्याधिष्टीत व जातीभेदाधिष्टित आहे. स्पूश्यास्पृश्य भेद तसेच आदिवासी यांचेही स्तर येथील समाजरचनेमध्ये आहे. नगर ग्रामीण जीवनापासून अलिप्तपणे वनात राहणाऱ्या गोंड, भिल्ल् वारली कातकरी ठाकुर कोरकू इ जमातींचा समावेश होतो. आदिवासीचं पण काही अंशी स्थायिक झालेल्या वंजारी, वडार, कोळी, पारधी, आंद, कोलम, इ जमाती तसेच काही भटक्या जमाती महाराष्ट्रात आहेत. राज्यातील आदिवासी सहयाद्री विभाग, सातपुडा विभाग आणि गोंडवण विभाग, अशा तीन भौगोलिक पट्ट्यात आहे.

भारतीय राज्यघटनेच्या ३६६ (२५) या कलमान्वये आदिवासींना अनुसूचित जमाती किंवा वर्गीकृत जमाती ही संज्ञा वापरली गेली आहे. आदिवासी लोक हे प्रामुख्याने डोंगर दऱ्या, घनदाट अरण्य आणि ओसाड जागेवर राहतात. बऱ्याच आदिवासी लोकांचा उदरनिर्वाह जंगलावर अवलंबून आहे. 80% राज्यात आदिवासी समाज शेतीवर अवलंबून आहे. त्यात प्रामुख्याने अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोरम, नागालँड, इ चा समावेश होतो. आसाम मणीपुर सिक्कीम त्रिपुरा, या राज्यात आदिवासींचे प्रमाण २० ते ३० टक्यांच्या दरम्यान आहे सर्वात जास्त आदिवासींचे प्रमाण मध्य भारतात आढळते. राज्यानिहाय सर्वात जास्त आदिवासीची लोकसंख्या मिझोरम राज्यात आहे ९४.४% तर सर्वात कमी गोवा राज्यात आहे 0.0४% आहेत. केद्रशासीत प्रदेशात सर्वात जास्त आदिवासी लक्षदीप मध्ये ९४.७% सर्वात कमी अंदमान निकोबार मध्ये ८३ % आहेत.

आदिवासींच्या लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्र राज्याचा भारतात पाचवा क्रमांक लागतो. मध्ये प्रदेश, ओरिसा, बिहार, गुजरात या ४ राज्यात महाराष्ट्रापेक्षा जास्त आदिवासी आहे. महाराष्ट्रातील आदिवासी महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक स्थान आणि लोकसंख्येचा विचार केल्यास २००१ च्या जगनगणनेनुसार लोकसंख्येमध्ये व क्षेत्रफळा मध्ये महाराष्ट्र राज्याचा तिसरा क्रमांक लागतो. मात्र 2011 च्या जगगणनेनूसार लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक लागतो. महाराष्टाचे क्षेत्रफळ ३०३७७७ लाख वर्ग किलोमिटर असून त्याचा भारताच्या एकूण क्षेत्रफळापैकी ९.६६ एवढा भुभाग आहे २००१ च्या जनगणेनुसार महाराष्ट्रातील आदिसावींचे एकुण लोकसंख्येशी प्रमाण ९.२७% इतके आहे.

प्रचंड लोकसंख्या असलेल्या आदिवासींचे जमातील भिल्ल, गावित, धानका, पावरा, हुकळा, पारधी, कोलम, तडवी, भाबची, कोरची, कोरकु, महादेव कोळी, वारली, कातकी, कोकणा, ठाकर ठोर, कोळी, मल्हार कोळी, कातोडी, गोंड, मोडिमास, गोंड मांडिमा, गोंड, कोला, परधान, आंध्र कोमा, हलवा, करव, या आदिवासी जमातींच्या प्रामुख्याने समावेश आहे.

महाराष्ट्रातील आदिवासींच्या ज्या अनेक जमाती आहेत त्या प्रत्येक जमातीचे सामाजिक जीवन, आर्थिक जिवन, सांस्कृतीक जीवन, सांस्कृतीक वैशिष्टये, चालीरिती, धार्मिकता, रुढी, परंपरां यात साखेपणा आढळुन येत नाही, प्रत्येक जमातीच्या परंपरागत चालिरिती धार्मिक रुढी या भिन्न् भिन्न् आहेत. महाराष्ट्रातील आदिवासी वसाहती स्वरुप भिन्न् प्रकारचे दिसते. यात धुळे :- भिल्ल, पावरा, गावीत, नाशिक : कळवण ईगतपुरीत भागात, कोकणी, महादेव कोळी, ठाकुर तर :- ठाणे :- वारली जमाती आहे. रायगड : ठाकुर कातकरी, अहमदनगर : ठाकुर, महादेव कोळी, पुणे- आंबेगाव विभाग :- पारधी समाज आहे. यवतमाळ, भंडारा, चंद्रपुर मध्ये कोलम तर गडचिलोरी: गोंड, माडिया, प्रधान, नांदेड मधील किनवट तालुक्यात गोंड, राजगोंड, कोलाम, आंध, प्रधान, थोटी व भिल्ल या आदिवासी जातींच्या वस्त्या आहेत.

**• संशोधनाची उद्दिष्ट्ये -**

1. आदिवासी समाजाच्या समस्यांचा अभ्यास करणे.
2. आदिवासी समाजाच्या समस्यांचे निरसन करण्यासंदर्भात उपाययोजना सूचविणे.

• संशोधन पद्धती -

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम तथ्ये उपयोगात आणलेली आहेत. यात ग्रंथालयीन व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा आधार घेण्यात आलेला आहे. यात वर्तमानपत्रे, मासिके या साधनांचाही उपयोग करण्यात आलेला आहे.

**आदिवासी समाजाच्या समस्या**

**१. निरक्षरता :-** एखादीगोष्टसमजून घेऊन लिहिल्या, वाचण्याची क्षमता म्हणजेसाक्षरता आणि साक्षरतेची एक ढोबळ व्याख्या केली जाते. अर्थातच या क्षमता ज्यांच्याजवळ नाहीतो निरक्षरहोय. आदिवासी समाजात सर्वच जमीतींना भाषा ( language) नाही. अनेक जमातींची स्वतःची बोली (dialect) असते. भाषेला लिपी असते. बोलीला नसते. उदा. मराठी, हिंदी भाषा आहे. कैकाडी, नंदीवाले,

वडार यांची बोली आहे. बोली एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होते. लिपीच नाहीतर शिकवणार कसे नि काय? मुळात एखाद्या जमातीची लोकसंख्या एखाद्या पाडया- वाडीपुरती मर्यादित असते. त्यांच्यासाठी शाळाकशीकाढणार? काढलीतर त्यांच्याच बोलीत शिकविणारे शिक्षककुटून आणणार? जेथेगोंडीसारखी बोलीभाषा आहेतेथेसुद्धा शिकविणाऱ्या शिक्षकांची अनुपलब्धता आणि भाषेचा माध्यमाचा प्रश्न आहेच. प्रगत - पुढारलेल्या समाजातील शिक्षक'स'. समचा शिकविणार, आदिवासी विद्यार्थ्याला 'स' सशाचा शिकवावा लागेल. इंग्रजी शिक्षणाने पुर्णसाक्षरता आली नाही. दुसरीकडे मातृभाषा बोलीचा त्याग त्यातून निरक्षरतातशीच राहिली. आसाम, प. बंगाल, नागालँड येथील जागा, खासी, - लियन, ईरुला, अडिसी इ. जमीतीतीलकाही कुंटुंबे निरक्षर राहिली किंवा अल्पशिक्षित झाली.

आदिवासींच्या शिक्षणासाठी शासनाने वस्तीशाळा, आश्रमशाळा, माफत गणवेश, मधल्या सुट्टीत भोजन, मुलींना उपस्थिती भत्ता इ. पुरवूनही अपेक्षित शिक्षणप्रसार झाला असे म्हणता येणार नाही. भटकंती, मजुरी, वेठबिगारी, हमाली, बांधकाम मजुरी, घरगडी, शेतमजुर, गुराढोरांमागे फिरणे यातून पोटाची भ्रांत असताना शाळेत जाऊनकाय साध्य होणारहाच विचार प्रबळ ठरतो. विशेषतः भटकंती, स्थलांतरामुळे एकाच ठिकाणी राहणे अशक्य असल्यानेते आसाम, मिझोराम, झारखंड, त्रिपुरा, नागालँड, उत्तराखंडमधील आदिवासी शिक्षणापासून वनित राहिले आहेत.

**२. दारिद्रय :-** अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूतगरजांची पूर्तताकरण्याचीक्षमता नसणे म्हणजे दारिद्रयहोय. अशी दारिद्रयांची व्याख्या करतात. ज्या समाजामध्येसदस्यांच्या जीवन निर्वाहविषयक किमान आवश्यकगरजा भागविण्याचीही परिस्थिती नसतेतो समाज दारिद्रययुक्त समाज म्हटला पाहिजे. अन्न, वस्त्र, निवारा या मुलभुत गरजा म्हटले जात असलेतरी पाणी, शिक्षण, आरोग्य, मनोरंजन याहीगरजांचा त्यात समावेश असतो असला पाहिजेहेही ध्यानात घ्यावे.

आदिवासींच्या आर्थिक क्रियांमध्ये आपण असे पाहिलेकी आदिवासी समाजात बहुसंख्य लोकहे अन्न संकलन, शिकार, मासेमारी, बदलती कुऱ्हाड शेती, हस्तव्यवसाय, मोल मजुंरी अशा संमिश्र आर्थिक क्रियाकरतात. काही मोजक्याच या सगळया आर्थिक क्रिया बारमाही चालू असल्या तरी उदरनिर्वाहापुरतेच उत्पन्न मिळण्याची पद्धत असल्याने साठेबाजी, नफेखोरीला वाव नाही. आज मिळाले पुरे. उद्याचे उद्या. हीच जीवनशैली जंगलतोड प्रतिबंध कायदा, वन्यजीव संरक्षणकायदा यांसारख्याकायद्यांमुळे जळणासाठी लाकूडफाटातोडणे, पोटासाठी शिकारकरणे यावर मर्यादा आल्याने आपल्याच वाडवडिलांच्या भूमीत जंगलाचे राजेगुन्हेगार ठरु लागले. जंगलव्याप्त नागालँड, अरुणाचल प्रदेश, मेघालय, मणीपूर, आसाम, उत्तरप्रदेश, झारखंड, ओरिसा, आंध्रप्रदेश, उत्तराखंड, महाराष्ट्रातील चंद्रपूर, गडचिरोली, मेळघाट, कोकण किनारपट्टीतील आदिवासी समाजात हे जाणवते. वन कर्मचाऱ्यांनी आदिवासींची हत्यारे जप्त करुन त्यांच्यावर कारवाई करण्याने आदिवासी समाज भयप्रद दारिद्रयात जगत आहे.

**३. कुपोषण :-** नंदुरबार जिल्हयातकुपोषणाची समस्या पूर्वीसारखी गंभीर नसलीतरी कुपोषणबाबतत अपेक्षित ध्येयगाटू शकलो आहोत असे म्हणता येणार नाही. उदरनिर्वाहासाठी आई वडील दोन्हीकामकरतातत्यामुळे मुलांकडे लक्ष देता येत नाही. तसेच रोजबारासाठी स्थलांतर करावे लागतो, मजुरीसाठी बाहेरगावी जावे लागते. प्रत्येक वेळी मुलांना सोबत घेऊन जाता येत नाही. त्यामुळे देखील मुलांकडे दुर्लक्षहोतो. लसीकरणाबाबत लोकांमध्ये अजूनही जागृकता निर्माण नाही.

**४. कर्जबाजारीपणा :-** आदिवासींच्या बहुतेक सर्व समस्या या परस्परव्यापी आहेत. मुळातील असलेल्या दारिद्रयावर उपाय म्हणूनकर्ज काढणे शेती - व्यवसायातून अपेक्षित उत्पन्न न मिळणे, परिणामीकर्जफेड न होणे यातून महाराष्ट्रात अनेक शेतकरी आत्महत्याकरीत असल्याच्या घटना समाजपटलावर दृश्यमान होत आहेत. जंगलच्या राजांना परंपरागत जंगलावरील हक्कांपासून वंचित करण्यात आले. जंगले आणि खाणी ठेकेदारांच्याकडे गेल्या. आपल्याच भूमीत आदिवासी उपरे झाले. ठेकेदार सावकारांनी आदिवासी पिढयानुपिढयाकर्जातच राहतील अशी व्यवस्था केली. सावकारांच्या, जमीनदारांच्या ताब्यात गेलेल्या आपल्याच शेतावर मजुरीकरण्याची वेळ त्यांच्यावर आली. भरीस भर म्हणून स्त्री- पुरुषांच्यात मद्यपानाचे व्यसन, कुपोषण, अनारोग्य, निरक्षरता, आर्थिक शोषण या सगळयांमुळे आदिवासींच्या पिढयाकर्जाच्या ओझ्याखाली राबल्या बेल्या.

**५. जमिनीचे हस्तातरण :-** दुसऱ्यांच्या हाती देणे, स्नेहतोडणे, परकीय भाव असेत्याचे मराठीत अर्थ आहेत. काल मार्क्स यांनी मालककामगार यांच्या संघर्षाच्या संदर्भात alienation हीसंकल्पना योजली असून त्याला समाजशास्त्रीय परिभाषेत अलगता किंवा परात्मता असे म्हणतात. येथे मात्र आदिवासी समाजाच्या समस्यांच्या संदर्भात Alienation of Land म्हणजे जमिनीची विल्हेवाट जमिनीचेहस्तांतरण या अर्थानेही संज्ञ आयोजली आहे.

आदिवासी हे येथले भूमीपुत्र आहेत. गोंड, बैगा, संथाल, नागा, टाकूर, वारली, कादर, पलियन, चेंचू, भिल्ल वगैरे आदिवासी पिढयानपिढया, मुक्तपणे या जमातींचा वापर अर्थोत्पादनासाठीकरीत आल्या आहेत. आदिवासींनी या जमिनीखरेदी केल्या नाहीत. हे वास्तव आहे. पण या जमिनीगेली शेकडो वर्षे त्यांच्याच ताब्यात असूनते जमिनीतूनकष्टकरीत आहेतहेही वास्तव आहे. याच कारणासाठी त्यांचा जमिनीवर हक्क आहे अशीत्यांची भावना आहे. पण जंगले व वन्यप्राण्यांना अभय देण्यासाठी इंग्रजांनी The National Forest Policy, १८५२ द्वारे आदिवासींच्या शिकार, जंगलतोड, शेतीवर नियंत्रण आणि निबंध लादून

आदिवासींना भूमिहीन करण्याची नांदीचकेली. आदिवासींच्या जमिनीचे हस्तांतरणकरण्यासाठीखालील तंत्र, युक्त्यांचा अवलंब केला गेला.

६. **व्यसनाधिनता :-** आदिवासी समाजातील बहुतांशी लोकसंख्या पारंपारीक व्यवसायात गुंतलेली आहेत. त्यात मध्यनिर्मिती त्यांचा पारंपारीक व्यवसाय आहे. अज्ञान, आरोग्य जागृतीचा अभाव यामुळे आदिवासी व्यसनाधिनतेकडे वळतात. त्यामुळे त्यांचा अपेक्षित सामाजिक विकास होऊ शकलेला नाही.

**७. भांडवलाचा अभाव :-** आदिवासी समाजामधील ज्या व्यक्ती लघुउद्योग सुरु करू इच्छितात किंवा असे उद्योग चालविण्याची क्षमता आहे त्यांच्याकडे भांडवलाचा अभाव असल्यामुळे आर्थिक विकासात अडथळे निर्माण झालेले आहेत.

**८. कुटुंबाचा आकार :-** आदिवासी समाजातील पारंपारीक गर्तेत अडकलेली समाज व्यवस्था, कुटुंब नियोजनासंबंधी अपेक्षित जागृती न झाल्यामुळे कुटुंबाची संख्या वाढत चालली आहे. परिणामी कुटुंबातील सर्वच पाल्यांच्या मुलभूत गरजा व्यवस्थितपणे पूर्ण होऊ शकत नाहीत. परिणामतः एकूणच त्यांच्या विकासात अडथळे निर्माण होतात.

**• उपाययोजना**

1. आदिवासी समाजाच्या आर्थिक विकासासाठी असणाऱ्या विविध शासजीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजवणी करणे.
2. आदिवासींना राजकीय हक्कांची जाणिव करून देण्यासाठी शासकीय स्तरावर जनजागृती करणे.
3. आदिवासींच्या विकासासाठी व्यसनमुक्तीपर मोठ्या प्रमाणात जनजागृती कार्यक्रमांची आखणी करणे.
4. आदिवासी समाजातील मुला-मुलींना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहीत करणे.
5. > आदिवासी समाजामध्ये सामाजिकदृष्ट्या जनजागृती करणे.
6. आदिवासींना स्थानिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचावणे.
7. आदिवासी समाजाची अंधश्रद्धा, दैववाद यांच्यापासून मुक्तता करण्यासाठी जनजागृती अभियान राबविणे..

**समारोप**

आदिवासी लोक हे प्रामुख्याने डोंगर दर्यात घनदाट अरण्यात राहतो. शेतीवर अवलंबून असलेला हा समाज विकासच्या प्रक्रियेपासून वंचित आहे त्याचप्रमाणे शासकीय योजनांचा फायदा समाजातील सर्व स्तरातील लोकांना मिळत नाहीत. त्यासाठी आदिवासी समाजाने संघटित होणे गरजेचे आहे. जागिकीकरण प्रक्रियेत सहभागी होऊन नैसर्गिक उत्पादन पोहचवणे आवश्यक आहे. यासंदर्भात शासनाची भूमिका महत्त्वाची आहे तेव्हा आदिवासी समाजाचं विकास होईल.

**संदर्भग्रंथ**


1. **आगलावे प्रदीप (२००४)** आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, श्री साईनाथ, नागपूर.
2. **राठी शुभांगी (२०१३)** महाराष्ट्रातील सामाजिक- राजकीय चळवळी व प्रशासन, अथर्व प्रकाशन, जळगाव.
3. **गुरुनाथ नागगोंडे (२०१२)** भारतीय आदीवासी, कॉन्टीनेंटल प्रकाशन पुणे.
4. **गोविंद गारे (१९७५)** आदिवासींचे प्रश्न, आदिम प्रकाशन, पुणे.
5. **माणिक माने आणि ए. ए. गढवाल (२०१२)** आदिवासीचे समाजशास्त्र, विदया प्रकाशन, नागपुर.
6. **संगवे विलास (१९७८)** आदिवासीचे सामाजिक जीवन, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
7. लोकराज्य मासिक, ऑगस्ट-सप्टेंबर २०१३
8. महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, माहिती पुस्तिका २०११-१२.